एम.बी.बी.एस. आणि बी.डी.एस. अभ्यासक्रमांच्या विद्यार्थ्यांना राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजनेंतर्गत शिष्यवृत्ती अदा करण्यासाठी कुटूंबाच्या उत्पन्न मर्यादेत वाढ करणेबाबत...

**महाराष्ट्र शासन**

वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग,

शासन निर्णय क्रमांक.एमईडी १०१८/प्र.क्र.४९/१८/शिक्षण-२

गो.ते.रुग्णालयाची नवीन इमारत, ९ वा मजला, गो.ते.रुग्णालय संकुल,

लोकमान्य टिळक मार्ग, मुंबई- ४०० ००१.

दिनांक: २८ जून,२०१८

**संदर्भ:-** १)शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग क्र.टीईएम-२०१६/प्र.क्र.५०१/तांशि-४, दिनांक १३/१०/२०१६

२)शासन निर्णय, वैद्यकीय शिक्षण व औषधीद्रव्ये विभाग क्र.एमईडी१०१६/प्र.क्र.४७३/१६/ शिक्षण-२, दिनांक ०९/१२/२०१६

३)शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग क्र.संकीर्ण-२०१७/प्र.क्र.३३२/तांशि-४, दिनांक ०७/१०/२०१७

४)शासन निर्णय, विमुक्त जाती व भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग कल्याण विभाग क्र.इबीसी-२०१७/ प्र.क्र.२७/शिक्षण, दिनांक ०१/०१/२०१८

५)शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग क्र.टीईएम-२०१८/प्र.क्र.३५/तांशि-४, दिनांक ३१/०३/२०१८

६)शासन निर्णय, वैद्यकीय शिक्षण व औषधीद्रव्ये विभाग क्र.एमईडी१०१६/प्र.क्र.४७३/१६/ शिक्षण-२, दिनांक ०५/०३/२०१८

७)शासन निर्णय समक्रमांक, वैद्यकीय शिक्षण व औषधीद्रव्ये विभाग, दिनांक १७/०४/२०१८

**प्रस्तावना:-**राज्यातील शासकीय/शासन अनुदानित/खाजगी विनाअनुदानित वैद्यकीय व दंत महाविद्यालयातील रु.२.५० लाख ते रु.६.०० लाख या वार्षिक कौटुंबिक उत्पन्न गटातील आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील एम.बी.बी.एस आणि बी.डी.एस अभ्यासक्रमांच्या विद्यार्थ्यांना घेतलेल्या शैक्षणिक कर्जावरील व्याज अनुदानाऐवजी इतर अभ्यासक्रमांप्रमाणे ५० टक्के शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती "राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजनेंतर्गत" संदर्भाधीन दिनांक १७/०४/२०१८ रोजीच्या शासन निर्णयान्वये अनुज्ञेय करण्यात आली आहे. तथापि, संदर्भाधीन दिनांक ३१/०३/२०१८ रोजीच्या शासन निर्णयान्वये "राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना" अंतर्गत पात्रतेकरिता कुटूंबाची उत्पन्न मर्यादा रु.६.०० लाख वरुन रु.८.०० लाख अशी वाढविण्यात आली आहे. उक्त योजनेच्या लाभासाठी उत्पन्न मर्यादेतील सदर वाढ ही राज्यातील शासकीय/शासन

अनुदानित/खाजगी विनाअनुदानित वैद्यकीय व दंत महाविद्यालयातील एम.बी.बी.एस आणि बी.डी.एस अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांनादेखील लागू करण्यात यावी असा निर्णय मराठा क्रांती मोर्चाच्या विविध मागण्यांबाबत निर्णय घेण्याकरिता शासनाद्वारा स्थापन करण्यात आलेल्या मंत्रिमंडळ उपसमितीच्या दिनांक ०३/०५/२०१८ रोजीच्या बैठकीत घेण्यात आला असून त्यानुसार आदेश निर्गमित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय:-**

१. राज्यातील शासकीय/शासन अनुदानित/खाजगी विनाअनुदानित वैद्यकीय व दंत महाविद्यालयातील आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील एम.बी.बी.एस आणि बी.डी.एस अभ्यासक्रमाच्या पात्र विद्यार्थ्यांना आरोग्य विज्ञानाच्या इतर व्यावसायिक पदवी अभ्यासक्रमाप्रमाणे "राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिष्यवृत्ती योजनेंतर्गत" त्याच्या शिक्षण शुल्काच्या रक्कमेची ५०% शिष्यवृत्ती अदा करण्याच्या अनुषंगाने दोन्ही पालकांची एकत्रित वार्षिक उत्पन्न मर्यादा रु.६.०० लाखावरुन रु.८.०० लाख करण्यास शासनाची मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

२. या योजनेचा लाभ हा शैक्षणिक वर्ष २०१८-१९ पासून लागू राहील.

३. उपरोक्त निर्णयानुसार सन २०१८-१९ पासून आरोग्य विज्ञानाच्या सर्व मान्यताप्राप्त व्यावसायिक अभ्यासक्रमातील आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील ज्या विद्यार्थ्यांच्या पालकांचे एकत्रित वार्षिक उत्पन्न हे रु.८.०० लाखाच्या मर्यादेत असेल, त्या विद्यार्थ्यांना "राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजनेंतर्गत" ५०% शिक्षण शुल्क शिष्यवृत्तीचा लाभ अनुज्ञेय होईल.

४. उत्पन्न मर्यादेतील वरील सुधारणेनुसार "राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना" ही विहीत अटी व शर्तीनुसार पूर्वीप्रमाणेच राबविण्यात येईल.

५. हा शासन निर्णय हा मंत्रिमंडळ उपसमितीच्या मान्यतेने व वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्रमांक २५५/२०१८/व्यय-१३, दिनांक २६/०६/२०१८ अन्वये प्राप्त सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक क्रमांक 201806281622173413 असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

२८/६/१८

(सुरेन्द्र प्र.चानकेर)

उपसचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

मा.राज्यपाल यांचे सचिव, राज्यपाल सचिवालय, राज भवन, मलबार हिल, मुंबई

मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद, मुंबई यांचे सचिव, विधान भवन, मुंबई

मा.अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा, मुंबई यांचे सचिव, विधान भवन, मुंबई

मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई

मा.मंत्री, महसूल तथा अध्यक्ष, मंत्रीमंडळ उपसमिती यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई

मा. मंत्री (वित्त) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई

मा. मंत्री (वैद्यकीय शिक्षण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
मा. विरोधी पक्ष नेता, महाराष्ट्र विधानपरिषद यांचे सचिव, विधान भवन, मुंबई
मा.विरोधी पक्ष नेता, महाराष्ट्र विधानसभा यांचे सचिव, विधान भवन, मुंबई
मा.राज्यमंत्री (वैद्यकीय शिक्षण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई
अपर मुख्य सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई
प्रधान सचिव, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई
सचिव, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
सचिव,अल्पसंख्यांक विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
सचिव, विमुक्त जाती-भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग आणि इतर मागास प्रवर्ग कल्याण विभाग मंत्रालय, मुंबई
सचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधीद्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई
महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबई
महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-१/२, मुंबई/नागपूर
महालेखापाल (लेखा परीक्षा), महाराष्ट्र-१/२, मुंबई/नागपूर
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई
सर्व जिल्हा कोषागार अधिकारी
आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक
संचालक, समाज कल्याण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे
संचालक, विजाभज इमाव व विमाप्र, पुणे
संचालक, आरोग्य सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई
सर्व सहसचिव/उपसचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधीद्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई
संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालय, मुंबई
संचालक, आयुष संचालनालय, मुंबई
कुलसचिव, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक
संचालक, वैद्यकीय शिक्षण व प्रमुख रुग्णालये (बृहन्मुंबई महानगरपालिका)
अधिष्ठाता/प्राचार्य सर्व शासकीय/महानगरपालिका/अनुदानित/खाजगी विनाअनुदानित आरोग्य विज्ञान महाविद्यालये (संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालय/आयुष संचालनालय यांचेमार्फत)
निवडनस्ती (शिक्षण-२)